## मध्यवर्ती मराठी कथेच्या प्रकाशात

# गोमंतकीय कथा १९६१-१९८७

प्रा. बाळकृष्णजी कानोळकर



**१९** डिसेंबर १९६१ रोजी गोवा मुक्त झाला. आणि गोमंतकाचा संघप्रदेश भारतीय प्रजासत्ताकात समाविष्ट झाला. १९८७ मध्ये स्वतंत्र राज्य म्हणून गोव्याला मान्यता मिळाली. १९६१ ते १९८६ हा २५ वर्षांचा कालखंड गोव्याच्या जडणघडणीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा असा कालखंड. या काळात गोव्यामध्ये अनेक प्रकारच्या चळवळी आणि आंदोलने झाली. अनेक सांस्कृतिक आणि साहित्यिक उपक्रम संपन्न झाले. अनेकविध संस्थाची स्थापना झाली. मराठी भाषेच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे असे निर्णय आणि संघर्ष याच काळात झाले. पैकी जनमतकौल, मराठी राजभाषा प्रस्थापन समितीची स्थापना, मराठी अकादमीची स्थापना आणि राजभाषा आंदोलन ह्या महत्त्वाच्या घडामोडी होत. मराठी भाषेच्या विकासाच्या आणि साहित्य निर्मितीच्या बाबतीत विचार करता उपरोल्लेखित घटना महत्त्वपूर्ण आहेत याविषयी कुणाचेही दुमत होण्याचे मुळीच कारण नाही. परंतु याहीपेक्षा अधिक महत्त्वाच्या घटना म्हणून मुक्त गोमंतकात एकापाठोपाठ एक सुरु झालेल्या गोमंतक, नवप्रभा, राष्ट्रमत, प्रदीप वगैरे सारख्या मराठी दैनिकांची नोंद घ्यावी लागेल. त्याचप्रमाणे मुक्त गोमंतकाच्या नामदार दयानंद बांदोडकरांच्या नेतृत्वाखाली पहिल्या लोकनियुक्त सरकारलाही विसरुन चालणार नाही. गोमंतकात मराठी भाषा, शिक्षण आणि साहित्य यांची परंपरा होतीच. मुक्ति आंदोलनाच्या काळात इथली साहित्य परंपरा काही अंशी खंडीत झालेली होती. बांदोडकर सरकारने मराठी प्राथमिक शिक्षणाची सोय करुन देण्यासाठी सर्वत्र मराठी शाळा सुरु केल्या. परिणामस्वरुप मराठी भाषा, शिक्षण आणि साहित्यनिर्मितीला मोठ्या प्रमाणात चालना मिळाली. यामुळेच आजच्या कोंकणीतल्या अव्वल दर्जाच्या साहित्यिकांची साहित्यिक म्हणून जडणघडण मराठीमधूनच झालेली आहे. त्यापैकी काही साहित्यिकांनी आपल्या प्रारंभीच्या कालखंडात उच्च दर्जाची मराठी कथा, कविता निर्माण केलेली आहे. काहीजण अजूनही कोंकणीच्या बरोबरीनेच मराठी साहित्य-निर्मितीदेखील करताना दृष्टीस पडतात. सांगण्याचा मुद्दा असा की, मराठी शिक्षणामुळे बहुजन समाजातून प्राथमिक-माध्यमिक शिक्षण घेतलेल्या तरुण मुलांना साहित्यनिर्मितीसाठी आवश्यक असलेले भाषिक माध्यम उपलब्ध झाले होते. या साहित्यिक अंकुरांना खतपाणी घालण्याचे कार्य इथल्या दैनिकांच्या रविवारच्या आवृत्त्यानी आणि दिवाळीसहीत विशेष अंकानी केले. त्याचप्रमाणे गोवा मुक्त झाल्यानंतर गोमंतकातून परागंदा झालेल्या गोमंतक मराठी साहित्य संमेलनाची अधिवेशने गोमंतकामध्येच भरु लागली. त्याचबरोबर इथून पुढे जेष्ठ गोमंतकीय साहित्यिकाला संमेलनाध्यक्ष म्हणून मान देण्यात येऊ लागला. भरीसभर म्हणून १९६४ मध्ये अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन मडगावी संपन्न झाले. कला अकादमीची स्थापना आणि त्यामार्फत दिले जाणारे साहित्य पुरस्कार यांचाही साहित्यनिर्मितीसाठी प्रेरणाशक्ती म्हणून खचितच उपयोग झाला. गोमंतकीय सांस्कृतिक, भाषिक आणि साहित्यिक पर्यावरणाची यथार्थ कल्पना यावी म्हणून थोडीश्या विस्ताराने या कालखंडाची पूर्वपिठिका कथन करावी लागली.


गोव्यातील मुक्तिपूर्व मराठी साहित्य हे प्रामुख्याने (खरे तर सर्वस्वी) उच्च वर्णीयांची निर्मिती होती. याचे कारणच असे की 'लिवणं वाचणं' ही केवळ त्यांची आणि त्यांचीच मिरासदारी होती. या कालखंडातील मराठी कथा देखील त्याला अपवाद नाही. आणि त्यामुळे त्यांनी निर्मिलेले साहित्य- इथे कथा-ही बऱ्याच प्रमाणात बामणी वा सरंजामशाही वा सरदेसाई स्वरुपाची होती. त्यातून इथल्या सारस्वतांच्या जीवनाचे, तेही सरंजामशाही जीवनाचेच चित्रण झालेले आहे. त्याच्या बरोबरीने अपरिहार्यपणे इथल्या देवदासी समाजाचे चित्रण झालेले आहे, ते घरोब्यातून. त्यामुळे हे सर्वच कथासाहित्य प्राय: उपभोगवादी, रंजनवादी असे झालेले आहे. अपवादात्मक असे वास्तववादी

साहित्य ह्या लेखकांकडून निर्माण झालेले आहे तेही गोमंतकाच्या मुक्तिनंतर.

१९६१ ते ८६ या कालखंडात गोमंतकात मराठी कथेचे उदंड पीक आले. अक्षरश: शेकडो लोकांनी मराठी कथालेखन त्या काळात केलेले आहे. परंतु सर्वांच्याच कथा संग्रहरुपाने प्रकाशात येऊ शकल्या नाहीत. त्याचे कारण तत्कालीन गोमंतकात (आजसुद्धा) प्रकाशन व्यवसाय म्हणावा तसा स्थिरस्थावर झालेला नव्हता. तरीसुद्धा या उण्यापुऱ्या २५ वर्षांच्या कालखंडात सुमारे पस्तीत ते चाळीस कथाकारांचे अठ्ठावन्न ते साठ कथासंग्रह प्रकाशित झालेले आहेत. यात मुक्तिपूर्व काळात कथाकार म्हणून नावलौकिक मिळविलेले लक्ष्मणराव सरदेसाई, व्यंकटेश पै रायकर, जयवंतराव सरदेसाई, बा. द. सातोस्कर, बा.भ. बोरकर यांच्यासारख्या साहित्यिकांचा समावेश होतो. त्याचप्रमाणे त्यांच्याच पिढीतले परंतु उशिराने लेखन सुरु केलेले वा उशिरा कथासंग्रह निघालेले मनोहर हिरबा सरदेसाई, काशिनाथ पुंडलीक घोडे यांच्यासारख्या लेखकांचा समावेश होतो. त्याचप्रमाणे पुढे केवळ कोंकणी साहित्यसेवेला वाहून घेतलेल्या र.वि. पंडीतांचाही समावेश होताना दिसून येतो. स्त्रियांच्या बाबतीत मात्र स्थिती फारशी उत्साहवर्धक नाही. वासंती नाडकर्णी आणि इंद्रायणी सावकार/ हीच काय ती त्यातल्या त्यात दिलासा देणारी नावे आहेत, असेच म्हणावे लागेल. तर महादेवशास्त्री जोशींसारख्या मातब्बर कथाकाराने आपले लेखन थांबविल्याने त्यांचा असा एकही नवा कथासंग्रह या काळात प्रकाशित झालेला नाही. या कालखंडातले बहुप्रसवा कथालेखक म्हणून मनोहरराव सरदेसाई, सौ. वासंती नाडकर्णी, ~~चंद्रकांत काकोडकर~~, प्रा. मुरलीधर कुलकर्णी, डॉ. अरुण हेबळेकर यांचा उल्लेख करावा लागेल.

या कालखंडाचे वैशिष्ट्य असे की या काळात जे कथालेखन झाले आणि ज्याला आपण गोमंतकीय मराठी कथालेखन म्हणून ओळखतो त्यापैकी सकस लेखन करणारे (सर्वार्थाने) गोमंतकीय लेखक अगदी हाताच्या बोटावर मोजता येतील इतके अल्प आहेत. त्यात प्रामुख्याने सौ. वासंती नाडकर्णी, जयराम कामत, पु. शि. नार्वेकर, गणाधीश, खांडेपारकर, ज्ञानेश्वर कोलवेकर, विठ्ठल ठाकूर आदीचा समावेश होतो.

याच कलखंडात व्यवसायानिमित्ताने कधी गोव्यात तर कधी गोव्याबाहेर वा पूर्णपणे गोव्याबाहेर वास्तव्य करुन असलेले




डॉ. सुभाष भेंडे, सुधाकर प्रभू, इंद्रायणी सावकार, वि. ज. बोरकर, लक्ष्मीदास बोरकर इत्यादीचा समावेश करावा लागेल.

या कालखंडातील अत्यंत सक्षम कथालेखन करणारे लेखक मात्र नव-गोमंतकीय आहेत. व्यवसायानिमित्ताने आणि प्रामुख्याने 'गुरू-व्यवसाया'च्या निमित्ताने गोव्यात येऊन, गेली २०-२५ वर्षे इथे वास्तव्य करून राहिलेले हे लेखक आहेत. त्यात, डॉ. नरेश (कवडी) डॉ. अरुण हेबळेकर, डॉ. प्रल्हाद वडेर, प्रा. मुरलीधर कुळकर्णी, ~~फ्रांसिस फर्नांडीस~~, यशवंत कर्णिक यांचा अंतर्भाव होतो.

याच कालखंडातील नव्याने मराठी शिक्षण घेतलेल्या बहुजन समाजातील तरुण वर्गातून, वैशिष्ट्यपूर्ण कथालेखन करणारी जी मुले पुढे आली त्यात प्रामुख्याने चंद्रकांत गांवस, ~~शिवानंद तेंडुलकर~~, चंद्रकांत पार्सेकर, बा. सा. पवार, सीताराम शेट्ये, रवींद्र म्हार्दोळकर, गजानन मांद्रेकर, दादू मांद्रेकर यांची नोंद घ्यावी लागेल.

उपरोल्लेखित कथाकारांपैकी महत्वपूर्ण कथाकारांच्या कथाकर्तृत्वाचा ऊहापोह करण्यापूर्वी याच कालखंडात मराठीच्या मध्यवर्ती प्रवाहात साहित्याच्या या प्रांतांत कोणत्या गतीविधी कार्यरत होत्या, त्याचे शिलेदार, आणि सरदार याविषयी थोडक्यात ऊहापोह करणे आवश्यक आहे. मराठीत दरवर्षी सुमारे चार ते पाच हजार कथांचे उत्पादन होत असते. संख्यात्मक दृष्टीने पाहता मराठी कथेला बहर आलेला आहे हे खरे, पण तो खरा नसून फसवा आहे. गुणात्मक दृष्टीने पाहिले तर कथा या वाङमय प्रकाराचा आज संकोच होतो आहे. डॉ. वडेर यांची ही खंत आहे. हा कालखंड साठोत्तरी साहित्याचा कालखंड म्हणून ओळखला जातो. इतर साहित्य प्रकाराप्रमाणेच या कालखंडात कथालेखन हे कोणा एकाच्या प्रभावाखाली झालेले आढळून येत नाही. याउलट अनेक शिलेदारांनी आणि प्रवर्तकांनी या कालखंडावर आपली तप्त मुद्रा उठविण्याचा प्रयत्न केलेला असल्याचे दिसून येते. त्यापैकी काही जण सातत्याने प्रयत्न करत राहिले आणि त्यात ते यशस्वी झाले. बरेच जण इतिहासजमा झाले.

१९५५-६० दरम्यान कथालेखनांमध्ये पुन्हा एकदा साचलेपणा आला. कथा तंत्रामध्ये अडकली आणि मंत्र हरवून बसली. तिची सोडवणूक लघु-अनियतकालिकांच्या चळवळीने केली असे म्हणायला हरकत नाही. नवकथेनंतरची नवकथा म्हणूनही त्या काळातील कथा ओळखली जाते. या कालखंडात



कथाकार म्हणून ज्या लेखकांना रसिकमान्यता आणि विद्वन्मान्यता लाभली त्यात प्रामुख्याने ज्यांचा समावेश होतो ते असे : जी.ए., चि.त्र्यं. खानोलकर, विद्याधर पुंडलीक, जयवंत दळवी, दिलीप चित्रे, श्री. दा. पानवलकर, विलास सारंग, सर्वा कलाल, रा.रं. बोराडे, बाबुराव बागुल, शाम मनोहर, सानिया, गौरी देशपांडे, कमल देसाई, बाळकृष्ण प्रभुदेसाई, ह. मो. मराठे, प्रिया तेंडुलकर, डॉ. जयंत नारळीकर, उद्धव शेळके आदी. यांच्या कलाकर्तृत्वाची नोंद घेतल्याविना या कालखंडातील मराठी कथेचा आलेख पूर्ण होणे नाही.

उपरोल्लेखित सर्वच कथालेखक हे रंजनवादी कथालेखन करणारे नाहीत. किंबहुना रंजनवादी कथालेखन करणाऱ्या लेखकांकडून पाडण्यात येणाऱ्या 'मागणी तसा पुरवठा', 'बहारदार', दिवाळीच्या आनंदात भर घालणाऱ्या आणि अशाच प्रकारच्या इतर कथांचा विचार करणे मला इथे योग्य वाटत नाही. त्याच्यात देखील व. पु. काळे सारखे 'मास्टर क्राफ्ट्समन' आहेत. परंतु त्यानी मराठी कथा साहित्याचा आलेख उंचावण्यासाठी काही केले आहे असे म्हणणे औचित्यभंग ठरेल.

उपरोल्लेखित कथाकारांनी ज्या प्रकारची कथा मराठीत लिहिली ती प्रामुख्याने वास्तववादी, अतिवास्तववादी स्वरुपाची कथा आहे. त्यातल्या कुणी मनोविश्लेषणावर भर दिलेला असेल, तर दुसऱ्या कुणी माणसाच्या तुटलेपणावर, नियतीवादावर, शून्यवादावर भर दिलेला असेल. कुणी Prime Instinct चा, काम सारख्या आदी प्रेरणांचा मागोवा घेत कथा रचल्या असतील. या कळातल्या कथा कलात्मकतेची उच्च पातळी गाठताना दिसून येतात. त्यातून कथाकाराने मानवी संस्कृतीचा, माणसाचा विविध प्रकारे, विविध वाटांनी आणि वळणानी घेतलेला शोध, मानवी संस्कृतीचे आणि मनाचे केलेले उत्खनन पहावयास आणि अनुभवावयास मिळते. या कथा घटना वा प्रसंगकेंद्रित राहिलेल्या नाहीत. नानाविध व्यवसाय आणि कार्यक्षेत्रातील अनुभवविश्वाने त्या समृद्ध झालेल्या आहेत. जीवनाची व्यामिश्र अनुभूती त्यातून वाचकाला येत राहाते. हेच त्यांचे बळ. या कालखंडात झालेले कथालेखन अनेक प्रवृत्तीमूलक असे आहे. त्यातून पुढे काही नवे प्रवाह मराठी कथाविश्वात निर्माण झाले. वास्तववादी, दलित, विज्ञानकथा, स्त्रीवादी कथा, अतिवास्तववादी, शून्यवादी, अज्ञेयवादी कथा, अस्तित्ववादी कथा अनुवाद इ. सांगता येतील.


या पार्श्वभूमीवर या कालखंडातील गोमंतकीय मराठी कथालेखनाचा परामर्श घेतला तर हाताला फारसे काही लागत नाही असेच म्हणावे लागेल. त्यातही या साहित्यप्रकारामध्ये ज्या गोमंतकीयांनी आपल्या नावाची मुद्रा उमटवली असे म्हणता येईल त्यात प्रामुख्याने नव गोमंतकीय लेखकांचाच भरणा आहे. पुन्हा त्यातही डॉ. अरुण हेबळेकरांसारखा एखादा अपवाद सोडला तर इतर सारेच जण नवकथेच्या काळात वावरताना अनुभवास येते. स्त्रीकथाकारांमध्ये लक्षवेधक ठरलेल्या वासंती नाडकर्णी यांचे कथा लेखन विकसनशील आहे असे म्हणणे धाडसाचे ठरावे. परंतु त्यातल्या त्यात दिलासा देणारी बाब म्हणजे त्यानी आपल्या कथांतून स्त्रियांचे प्रश्न, स्त्रियांची दुःखे, तिची कुचंबणा, तिचे भावबंध, तिचे खचलेपण चांगल्या प्रकारे अधोरेखित केले आहे. परंतु तरीही त्याला स्त्रीवादी कथालेखन असे म्हणता येणार नाही.

डॉ. विठ्ठल ठाकुरानी आपल्या कथांतून जी.ए. चे अनुकरण करण्याचा यशस्वी प्रयत्न केलेला पहावयास मिळतो. रुपककथेचा प्रवाह गोमंतकीय कथालेखनात आणण्याचे श्रेय त्यांना देता येईल. त्यापेक्षा त्यांच्या कथेचे अधिक मूल्य असू शकत नाही. (डॉ.) नरेश (कवडी), डॉ. वडेर, प्रा. मुरलीधर कुलकर्णी आणि यशवंत कर्णिक या सर्वांमध्ये नरेश यांची कथा वैशिष्ट्यपूर्ण आहे. त्यांची तिरकस आणि उपरोधिक अभिव्यक्ती आणि त्यातील भाषिक अवकाश या दृष्टीने ती अभ्यासनीय ठरावी. प्रल्हाद वडेरांची कथा गाडगीळांना प्रदक्षिणा घातल्यासारखी वाटते. व्यक्तिमनाची भावावस्था ती परिणामकारकतेने व्यक्त करते. त्यातील जीवनानुभवाची प्रगल्भता लक्ष वेधून घेते. कथेनुसार त्यानी लवचिक शैलीचा केलेला वापर आशयाला वजन प्राप्त करुन देतो. जीवनचिंतन करणारी ही कथा आहे. मुरलीधर कुलकर्णी, यशवंत कर्णिक यांच्या कथालेखनात रचना, निवेदनतंत्र, भाषाशैली या अंगाने सफाईदारपणा जाणवतो.

डॉ. सुभाष भेंडे आणि विजय कापडी यांनी मात्र मराठी विनोदी कथेच्या प्रांतात गोमंतकाची पताका उंच उभारली असल्याचे सुखद चित्र पहावयास सापडते. आजच्या विनोदी मराठी कथेचे हे दोघे महत्त्वाचे शिलेदार आहेत. सुधाकर प्रभू, मोटे, नेसरीकर, सुखठणकर इत्यादीनी बालकथेचे दालन सजविले आहे. पैकी प्रभूंची कामगिरी राजमान्य आणि रसिकमान्यही झालेली आहे. गोव्याबाहेर राहून गोव्याचे नाव

उज्ज्वल करणाऱ्या मराठी लेखकांमध्ये त्यांचे नाव खूप-ि वर आहे.

अनुवादाच्या प्रांतात र. वि. पंडीत, सुखठणकर आणि डॉ. वडेर यांचे नाव घ्यावे लागते. डॉ. वडेरांचे हे कार्य अगदी आजपावेतो चाललेले पहावयास मिळते. अलीकडेच त्यांच्या अनुवादित इंग्रजी कथांचा संग्रहही प्रकाशित झालेला आहे.



डॉ. अरुण हेबळेकर ही मराठी साहित्यविश्वातली एक लक्षवेधक मुद्रा आहे. ते प्रामुख्याने कादंबरीकार म्हणून ओळखले जात असले तरी ते प्रथम कथालेखक आहेत. काही उत्कृष्ट कथा त्यांनी लिहिलेल्या आहेत. त्यापैकी काही संग्रह रुपाने (दोन) प्रकाशित झालेल्या आहेत. विज्ञानकथा हा त्यांचा आवडता प्रांत आहे. निवडक मराठी कथामध्ये त्यांच्या कथांचा समावेश झालेला आहे. मराठीतले ते एक प्रमुख विज्ञानकथाकार आहेत. वास्तववादी, अतिवास्तववादी असे त्यांच्या कथांचे स्वरुप असून त्यांत त्यांनी अनेक प्रकारचे प्रयोगही (कथनशैलीचा वैशिष्ट्यपूर्ण वापर यासारखे(सरहाने धरे धरे) केले आहेत. समर्थ वास्तववादी कथाकार म्हणून त्यांची नोंद घ्यावीच लागेल इतके त्यांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे,.

जयराम कामत, ज्ञानेश्वर कोलवेकर यांचे कथाविश्व विविध प्रकारच्या अनुभवांनी समृद्ध असे आहे. त्यांनी आपल्या विविध कथांमधून जीवनवास्तवाचा गंभीरपणे घेतलेला शोध जसा पहावयास मिळतो त्याचप्रमाणे काहीशा उपहासात्मक, मिस्किल शैलीतून जीवनातील अपमूल्याचे दांभिकतेचे दर्शनही ते घडवितात.

स. शं. देसाई यांनी आपल्या लेखनाद्वारे ऐतिहासिक कथेचा प्रवाह इथल्या कथेच्या प्रांतात आणून सोडलेला आहे. परंतु त्यांचे कथालेखन रंजनवादीच आहे. मनोहर हिरबा सरदेसाई, पु. शि. नार्वेकर इत्यादींचे लेखन हे प्रामुख्याने नवकथापूर्व कालखंडातील कथेशी नातेसंबंध सागंणारे आहे. त्यातही नार्वेकरांची कथा त्यांच्या आटोपशीर आणि प्रवाही निवेदनशैलीमुळे आकर्षक ठरली आहे. बोरकरांच्या मानाने सातोस्करांची कथा अधिक वास्तववादी उतरलेली आहे.

इतर लेखकांपैकी ~~शिवानंद तेंडुलकर~~, नरेंद्र बोडके, शरद नरेश इत्यादीचे लेखन हे साठोत्तरी कथेशी नाते सांगणारे आहे. परंतु संग्रहरुपाने त्यांची कथा उपलब्ध नसल्याने त्याची योग्य ती दखल घेतली गेलेली दिसून येत नाही.

मुक्तीनंतरच्या काळातील कथा लेखन मुक्तिपूर्व काळाशी तुलना करता खूपच व्यामिश्र आणि समृद्ध असलेली अनुभवावयास मिळते. परंतु प्रादेशिकतेचे घटक त्यातून गळून पडलेले पहावयास मिळतात. त्यामुळे पूर्व कालखंडाप्रमाणे या कालखंडात स्वत:च्या नावाची तप्त मुद्रा एकूण मराठी कथाजगतात उमटविणारा कथाकार आज तरी गोमंतकात कुठे दृष्टीपथात येत नाही.

या कालखंडातील एकूण मराठी कथेच्या निर्मितीशी गोमंतकातील मराठी कथेची तुलना करता जे चित्र दिसते ते मात्र फारसे सुखावह नाही. अनुकरणातून गोमंतकीय लेखक जेवढे लवकर बाहेर येतील आणि रंजनवादाची, लोकप्रियतेची झूल जितक्या लवकर जाणीवपूर्वक झुगारुन देतील तो दिवस गोमंतकीय मराठी कथेच्या प्रांगणातला सोनियाचा दिवस ठरेल.

●●●